# भारताची कम्युनिस्ट पार्टी (माओवादी)
# पश्चिम रीजन कमेटी (महाराष्ट्र)

**प्रसिद्धी पत्रक**

**दिनांकः 27/04/2015**

# जनता मागतेय पेसा आणि सरकार आणतेय बाधा!

## सरकार द्वारा चलविलेल्या सुधार ढोंगाचा पर्दाफाश करा!

## जमिनिसाठी दृढतेन संघर्ष करा!

मागील अनेक वर्षांपासून जनता 'पेसा' कायद्याच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा प्रशासनाकडे मागणी करीत आहे. तसेच जनतेद्वारा सातत्याने आपल्या गाव, टोल्यात ग्रामसभेला मान्यता प्राप्त करण्यासाठी प्रशासनाकडे पाठपूरावा देखिल चालु आहे. पेसा कायद्याद्वारे ग्रामसभेला जे गौण वनोत्पादनाचा अधिकार दिलेला आहे तो मिळावा ही मागणी मागील दिड वर्षांपासून जारी आहे. वाढीव बांबू कापणी दर जनतेने आपल्या संघर्षातुन प्राप्त केला आहे. ज्यामध्ये 25 फुट बांबूला 45 रूपये दर तर पेपर मिलसाठी 1 बंडल 90 रूपये प्रमाणे (एका बंडलात 2 मीटर प्रमाणे बांबूचे 20 तुकडे असतात) मिळवले आहे? परंतु पेपर मिल प्रबंधन व प्रशासन जनतेच्या संघर्षांवर विरजन घालण्यासाठी जनतेला मिळणाऱ्या वाढीव बांबू कापणी व विक्रीची अंमलबजावणी अजुनही झालेली नाही. त्यांच्याच द्वारा घोषित अधिकृत ग्रामसभे विना बांबू कापणी होणार नाही ही नवी अडचण निर्माण करून जनतेच्या मनात अधिक गोंधळ निर्माण करण्याचा कुटील डाव आहे. शासक वर्गांच्या असल्या दमनीय आणि लूट करणाऱ्या नीतिंचा आमची पार्टी तीव्र विरोध करीत आहे. तरी आमची पार्टी जनतेला आव्हान करीत आहे कि त्यांनी ह्या सरकारी षडयंत्रला ओळखून जनसंघर्ष करावे अन्यथा ग्रामसभेतुन जनतेला मिळणारे किरकोळ अधिकार ही हिसकावल्या जाण्याची शक्यता आहे.

जनतेद्वारा ग्रामसभांना अधिकृत करण्यासाठी प्रयत्न चालू असतांनाच जिल्हा प्रशासन त्याबाबत पुर्णतः अनुत्साही असुन आपल्या कामात दिरंगाई करीत आहेत. पेसा कायद्या अनुसार गावात सभा घेऊन जनतेद्वाराच ग्रामसभेला घोषित करण्याचे असतांनाही सरकार ग्रामसभा निर्मिती करीता जनतेला कारवाई अहवाल तयार करून तो जिल्हा प्रशासनाच्या सपूर्द करण्याचे सांगुन त्याच्या नंतर जिल्हा प्रशासन योग्य पडताळणी करून दोन महिण्या नंतर आपला अहवाल सादर करणार. असल्या गोष्ठी निव्वळ वेळ खाऊपणा आहे. आजच्या आधुनिक युगात दोन महिण्याची अवधि मागणे म्हणजे जनतेला सरासर मुर्ख बनविणे होय. 1996 मध्ये निर्माण झालेल्या पेसा कायद्याची अद्यापर्यंत कुठल्याही आदिवासी क्षेत्रात अंमलबजाणी झालेली नाही. ह्यावरून स्पष्ट होते कि सरकार आदिवासी जनतेबद्दल किती प्रामाणिक आहेत. परंतु आज जनतेद्वाराचं पेसा कायद्याच्या अंमलबजाणीची करीता मागणी होत असतांना सरकार त्यांचे ऐकण्याचे सोडुन त्यांच्या पुढे नवं-नवे पेच निर्माण करीत आहेत. आता हे म्हणत आहेत कि ग्रामसभाने दिलेला टीपी जिल्हा बाहेर चालणार नाही. प्रत्यक्षात हे टीपी देशात कुठेही चालु शकणार आणि जर चालणार नाही म्हटल्यावर ते प्रशासनाने वा सरकारने बघावे त्यात ग्राम सभेची भूमिका नाही. त्यात आणखी म्हणून वन अधिकारी म्हणत आहेत कि गावाची पुर्नमोजनी करावी लागणार. एकंदरी काय तर ग्राम सभा अटींवरच लागू करायचा सरकाच मानस दिसतोय. रोज नवं-नव्या अटी लावून साध्या-भोळ्या आदिवासी जनतेच्या अज्ञानतेचा फायदा उठवण्याचे प्रयत्न चालू आहेत. प्रत्यक्षात पेसाची निर्मितीच जुन्या सीमांना मान्यता देऊन झालेली असतांना तसेच त्यात निस्तार कुपची कुठलीही चर्चा नसतांना

सरकारद्वारा हेतूपरस्पर निस्तार कुपाचा नवा अवरोध उत्पन्न केल्या जात आहे. आता तर नवंच जीपीएस द्वारा गावांची मोजमाप करण्यासाठी हजारों रूपयांचे खर्च करायला भाग पाडून जनतेला हैरान-परेशान करून टाकलेले आहे. आणि सरकार प्रायोजित दलालां मार्फत नविन वन कायद्याचा दाखला देऊन पट्टा देण्याच्या थापा घालुन जनतेला फूस लावित आहेत. जनतेने हे स्पष्ट समजुन घ्यावे कि हे सर्व आपली दिशाभूल करीत आहेत आणि राहिले पट्टा देण्याचे तर ते फक्त ग्रामसभाचं देऊ शकते. ग्रामसभांनाच शाखा कमेट्यांची नियुक्ती करण्याचे अधिकार असतांना तसेच कुठल्याही शाखा कमेटीत कोण असणार हे सर्व ग्रामसभा ठरवित असतांनाही सरकार द्वारा योजित ग्राम सेवकांनाच ग्रामसभेचा सचिव बनवून सरकारी घुसखोरी करण्याचे कट-कारस्थान चालु आहेत. महाराष्ट्र सरकार द्वारा देखिल अधे-मधे अनेक जीआर काढुन ग्रामसभेला खालसा करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. मोदी आणि फडणविस सरकार द्वारा पेसा आणि ग्राम सभेला खारिज करण्यासाठी नविन भू-संपादन कायदा आणला आहे. ज्यात पूर्वीच्या भू-संपादन करीता अनूमतिची आवश्यक्ता होती ज्याची नविन कायद्यात आवश्यक्ता राहीलेली नाही. ह्या विरोधात देशभरातील अनेक शेतकरी, आदिवासी आंदोलन करीत आहेत. म्हणुन आमची पार्टी घोषणा करीत आहे कि संघर्षा शिवाय कुठलेही हक्क आणि अधिकार मिळाणार नाही. लूटेऱ्या सरकार द्वारा बनविलेले सर्व कायदे, कानून ढोंगी असून त्यातुन जनतेचा कुठलाही फायदा होणार नाही. जनतेच्या जीवनात कुठलेही आमुलाग्र परिवर्तन घडवुन आणने हे सरकार द्वारा निर्मित कुठल्याही नीति, कायद्यांचा उद्देश नसतो.

मागील अनेक वर्षांपासून जनतेला पट्टा देणार, पेसाची अंमलबजाणी करणार आणि जन जागृतीच्या नावावर अनेक देशी-विदेशी एनजीओ येथे कार्यरत आहेत. ज्यात प्रामुख्याने 'राष्ट्रीय लोक जनहितवादी मंच', 'सृजन' असल्या संघटना साध्या-भोळ्या आदिवासींना भ्रमित करीत आहेत. प्रत्यक्षात 'राष्ट्रीय लोक जनहितवादी मंच' संघटनेचा नेता सुरेश बारसागडे हा पोलिसांचा एजंट आहे. तसेच 'सृजन' ह्या संघटनेला स्विझरलँण्ड देशातील पैश्यातुन चालविल्या जाते. जनतेच्या हिताच्या बतावण्या करणारे हे लोक प्रत्यक्षात जनतेची क्रांती पासून दिशाभूल करून कायद्यां बद्दल जनतेला भ्रमित करीत आहेत. परंतु ह्यांची ही नाटकबाजी जास्त दिवस चालणार नाही; कारण लवकरच ह्यांचा पर्दाफाश होऊन जनता ह्यांना अद्दल घडविणार.

प्रिय जनता,

हे वन आपलेच आहे. ह्या संपुर्ण वनांवर आपलीच मालकी आहे. ज्याचा आपण आपल्या आवश्यक्ते प्रमाणे उपयोग करू शकता. परंतु आपणास असे न करू देणाऱ्यांना पळवून लावा. जल-जंगल-जमीन-इज्जती साठी संघर्ष करा! मोदी अनेक विदेशी दौरे करून कारपोरेट घराण्यांना देशात येण्यासाठी आमंत्रित करीत आहे. देशातील जमीन आणि अन्य नैसर्गिक साधन संपत्तिला विकण्यासाठीचा प्रयत्न करीत आहे. नरेन्द्र मोदीच्या 'मेक इन इंडिया'च्या धर्तीवर महाराष्ट्राचा मुख्यमंत्री आता 'मेक इन महाराष्ट्र' म्हणत जनतेला गाजर दिखवित आहे. एकंदरीत काय तर हे सर्व एकाच माळेचे मणी आहेत. ज्यांचा एकमात्र उद्देश देशाला विकणे आहे. ज्यासाठी ते अनुकूल असे कायदे बनवित आहेत किंवा त्यात परिवर्तन करीत आहेत. ह्या कायद्यातुन गरीब, आदिवासी जनतेचे कुठलेही 'अच्छे दिन' येणार नाही. म्हणुन संघर्षा शिवाय पर्याय नाही व संघर्षातुनच आपला हक्क आणि अधिकारांचे रक्षण होऊ शकते.

श्रीनिवास

(श्रीनिवास)
प्रवक्ता पश्चिम रीजन
महाराष्ट्र (दण्डकारण्य)